# -=: प्रकरण पहिले :=-

## प्रास्ताविक

१.१ विषय प्रवेश

१.२ संशोधनाचा विषय

१.३ संशोधनाची उद्दिष्टे

१.४ संशोधन विषयाचे महत्त्व

१.५ संशोधनाची मर्यादा

१.६ प्रकरणाचे सुसूत्रीकरण

संदर्भ ...

*-*-*

# प्रकरण पहिले

## प्रास्ताविक

### १.१ विषय प्रवेश :

आजच्या युगात कोणत्याही कार्याच्या यशासाठी प्रशासन, व्यवस्थापन आणि संघटन या महत्वाच्या बाबी आहेत. शिक्षण क्षेत्रात काम करीत असताना दैनंदिन जीवनातील विविध घटकांमध्ये समन्वय, सुसूत्रता साधुन योग्य प्रशासन असेल तरच कार्यवाही उत्तम प्रकारे होते.

भारतामध्ये १६०० ते १९२० च्या दरम्यान शैक्षणिक प्रशासनाच्या संदर्भात श्री. सिंग [१९८५] यांनी अभ्यास केला. मॅथ्यू [१९८७ ], बारुआ [१९८३ ] यांनीही पुढे अभ्यास केला असता असे दिसून आले की, माध्यमिक शिक्षणासारख्या महत्वाच्या टप्प्याची झपाट्याने वाढ होत असतांना प्रशासन मात्र रूढीवादी आणि नोकरशाहीयुक्त असेच आहे. कांही राज्यातील संशोधनाअंती दिसून आले की, प्रशासनाच्या प्राथमिक स्तरावरही दोष होते.

प्रशासनाची संकल्पना केवळ अध्ययन, अध्यापनाशीच किंवा कार्यालयीन कामकाजाशीच संबंधित आहे असे नसून प्रत्येक कार्यात प्रशासन ही महत्वाची बाब आहे. त्यामुळे वेळ, श्रम, पैसा यांचा योग्यप्रकारे विनियोग करण्यांत प्रशासन महत्वाची भूमिका निभावते.

प्रशासनाचा संबंध केवळ कार्यकारी व्यक्ती, अधिकारी किंवा कर्मचारी असा नसून त्यामध्ये मानवी संबंधाची गुंफण साधून कार्य साधावे

लागते. केवळ प्रशासक आणि पर्यवेक्षक यांच्याशीच प्रशासन संबंधित आहे असे नसून ते विद्यार्थी, शालेय वातावरण, शिक्षक-विद्यार्थी संबंध अशा विविध बाजू त्यात येतात. कांही बाबी चांगल्या प्रशासनात मदत करतात तर कांही बाबी अडथळा आणतात.

"प्रशासनाचा शब्दशः अर्थ कारभाराची व्यवस्था पाहणे, व्यवहार चालविणे असा होतो." श्री. फिओल यांच्या मते, "प्रशासन म्हणजे नियोजन करणे, संघटित करणे, समादेश देणे, समन्वय साधणे, नियंत्रण ठेवणे असा होय." [१]

श्री. ए.डी. ताम्हणकर यांनी शैक्षणिक प्रशासन व नियोजन या पुस्तकात शैक्षणिक प्रशासनाची व्याख्या दिली आहे, "सामाजिक आणि राजकीय गरजा आणि आकांक्षा यावर आधारित समाज आणि शासन यांनी मान्य केलेले हेतु सुकर रितीने साध्य करण्याकरिता उपलब्ध योग्य साधन सामुग्री आणि मनुष्यबळ यांचा जास्तीत जास्त आणि परिणामकारक उपयोग होईल अशा अध्ययन आणि अध्यापन विषयक अनुरूप कार्यक्रमाद्वारा मानवी गुणांचा विकास प्रभावीपणे प्रवर्तित करण्याची प्रक्रिया म्हणजे शैक्षणिक प्रशासन होय." [२]

शैक्षणिक प्रशासन हा शिक्षणाच्या विकासाचा एक अंगभूत भाग आहे, ती एक नैसर्गिक प्रक्रिया आहे तसेच तो सामाजिक उपक्रमही आहे.

शैक्षणिक प्रशासनामध्ये शैक्षणिक नियोजन, प्रशासनाच्या निरनिराळ्या घटकांतील संबंध आणि सहकार, प्रशासनाचे विकेंद्रीकरण, वित्त-

-व्यवस्था, प्रशासक, शिक्षक व कर्मचारी वर्गाचे प्रशिक्षण, महत्त्वाच्या साहित्याची तरतूद, संशोधनास आवश्यक त्या बाबींची तरतूद, परिणामाचे मूल्यमापन, समाज व संस्था यांतील संबंध, शैक्षणिक नियोजनाला द्यावयाची प्रसिध्दी, संस्था आणि समाजातील निरनिराळ्या घटकांना प्रेरणा देणे, उत्तेजित करणे आणि कार्यप्रवृत्त करणे आणि भविष्यकाळाच्या स्वरूपा-विषयीचा अंदाज बांधून तत्संबंधी मार्गदर्शन करणे इत्यादि बाबींचा समावेश होतो.

शिक्षणाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी शैक्षणिक प्रशासन हे कार्यक्षम व प्रभावी असावे लागते. संशोधक हे पंढरपूर शहरामध्ये गेली २ वर्षे एका माध्यमिक शाळेमध्ये उपशिक्षक म्हणून काम करीत आहेत. पंढरपूर तालुक्यातील अनेक माध्यमिक शिक्षकांचा संबंध त्यांच्याशी शिक्षक संघटना, मेळावे, शिबीरे, उद्बोधनवर्ग, शास्त्रप्रदर्शन या निमित्ताने आला. त्यांच्याशी माध्यमिक शिक्षणावरील चर्चेतून असे दिसून आले की, ब-याच शाळांमधून माध्यमिक शिक्षणाच्या प्रशासनाची आजची स्थिती समाधानकारक नाही. ह्या शाळांतील प्रशासनाची आजची स्थिती काय आहे हे जाणून घेण्याची उत्सुकता निर्माण झाली म्हणून संशोधकाने खालील विषय संशोधनासाठी घेतला.

## १.२ संशोधनाचा विषय :-

" पंढरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळांच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास. "

संशोधन विषय शिर्षकामध्ये आलेल्या शब्दरचनेचा अर्थ, विषय स्पष्ट होण्यासाठी व विषयाची व्याप्ती समजण्यासाठी खालील-प्रमाणे दिलेला आहे.

## पंढरपूर तालुका -

महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्याच्या ११ तालुक्यांपैकी पंढरपूर हा एक मोठा व महत्वाचा तालुका आहे. तालुक्याची लोकसंख्या अडीच लाख आहे. पंढरपूर तालुक्याच्या पूर्वेस मोहोळ तालुका, दक्षिणेस मंगळवेढा, सांगोला तालुके, पश्चिमेस माळशिरस तालुका व उत्तरेस माढा तालुका येतो. या तालुक्यांसाठी महत्वाचा तालुका पंढरपूर हाच असून जिल्हा न्यायालय, उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, दूरदर्शन लघुशक्ती सहक्षेपण केंद्र, विभागीय डाक अधिक्षक, व्यवसायकर, केंद्रीय उत्पादन शुल्क, प्राप्तीकर कार्यालये, सूक्ष्मतरंग केंद्र, रेल्वेस्टेशन, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन आगार ही कार्यालये आहेत. वेगाने विकास होत असलेला हा तालुका आहे.

भारतातील हे एक महत्वाचे तीर्थक्षेत्र आहे. दरमहा अनेक यात्रेकरू येथे येतात, तर वर्षातील चार मोठ्या यात्रांना भारताच्या कानाकोपऱ्यातून असंख्य भाविक येथे येतात. पंढरपूरला "दक्षिणेची काशी " असे म्हणतात. येथे दोन वरिष्ठ महाविद्यालये व पाच कनिष्ठ महाविद्यालये आहेत. चौदा माध्यमिक शाळा आहेत.

सोबत पंढरपूर तालुक्याचा नकाशा जोडला आहे.

माध्यमिक शाळा -

" माध्यमिक शालेय स्तरावर इ. ५ वी ते १० वी चे वर्ग येतात. " इ. १ ली ते इ. ४ थी चे वर्ग व इ. ११ वी, १२ वी चे वर्ग यात समाविष्ट नाहीत कारण ते अनुक्रमे प्राथमिक व उच्च माध्यमिक वर्ग आहेत. माध्यमिक शालेय स्तर हा पुढील शिक्षणाचा महत्त्वाचा पाया आहे.

प्रशासन -

निश्चित केलेल्या पध्दतीप्रमाणे कार्य चालण्याच्या दृष्टीने निरनिराळ्या नियमांचा आणि अधिकारांचा वापर करुन एकूण कामकाजावर नियंत्रण ठेवणे.

" उपलब्ध साधनसामुग्री आणि मनुष्यबळ यांचा जास्तीत जास्त आणिपरिणामकारक उपयोग होईल अशा अनुरुप कार्यक्रमाद्वारा मानवी गुणांचा विकास प्रभावीपणे प्रवर्तित करण्याची प्रक्रिया म्हणजे प्रशासन होय. "-३

प्रस्तुत संशोधनाच्या दृष्टीने प्रशासन म्हणजे पंढरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळांमध्ये असणारे प्रशासन, यामध्ये जिल्हापरिषद, पंचायत समिती यांचे शैक्षणिक अधिकार व प्रशासन, मुख्याध्यापकांचे व शैक्षणिक संस्थांचे प्रशासन याचा समावेश होतो.

१.३ संशोधनाची उद्दिष्टे :-

१] पंढरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळांतील प्रशासनाचे शासकीय कार्य, प्रशासकीय भूमिका, सेवाशर्ती व नियंत्रण यांचा अभ्यास करणे.

२] पंढरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळांतील व्यवस्थापन व पर्यवेक्षण माध्यमांचा अभ्यास करणे.

३] पंढरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळांतील भौतिक, आर्थिक, शैक्षणिक सुविधांचा अभ्यास करणे.

४] माध्यमिक शालेय प्रशासनामध्ये सुधारणा होण्यासाठी कांही उपाय सुचविणे.

## १.४ संशोधन विषयाचे महत्व :-

अध्ययन-अध्यापन प्रक्रिया चालू असतांनाच त्यावर विविध घटक कार्यरत असतात. त्यांचा अनुकूल, प्रतिकूल असा परिणाम होत असतो, म्हणून अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये प्रशासन हा एक महत्वाचा भाग असून शहरी, ग्रामीण, शासकीय, खाजगी, अनुदानित, विनाअनुदानित, इंग्रजी माध्यमाच्या, शेती शाळा, आश्रमशाळा, कन्याशाळा, अशा विविध संस्थांतील स्थानिक प्रशासनामध्ये फरक असू शकतो. एकाच पध्दतीचे प्रशासन सर्व ठिकाणी योग्य ठरणार नाही. या संशोधनाने शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शिक्षणातील प्रशासनासंदर्भात, नेमक्या कोणत्या अडचणी, समस्या येतात ? कोणते अनुकूल, प्रतिकूल बदल घडतात ? हे स्पष्ट होईल. प्रत्येक माध्यमिक शाळेतील भौतिक सुविधा, स्त्री शिक्षणाची व्यवस्था, त्यांचा अभ्यास केला जाईल. त्यामुळे प्रशासन प्रभावी व परिणामकारक कसे करता येईल याचे मार्गदर्शन होईल.

हे संशोधन माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षणाधिकारी, संस्थाचालक यांना प्रशासनाच्या समस्या व त्यावरील उपाय या संदर्भात मार्गदशक होईल.

१.५ संशोधनाची मर्यादा :-

१] हे संशोधन पंढरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळांपुरतेच मर्यादित आहे.

२] हे संशोधन इ. ५ वी ते इ. १० वी च्या वर्गाच्या माध्यमिक विभागापुरतेच मर्यादित आहे.

३] हे संशोधन शैक्षणिक प्रशासन व शालेय व्यवस्थापन या पुरतेच मर्यादित आहे.

१.६ प्रकरणाचे सूत्रीकरण :-

प्रकरण पहिले - प्रास्ताविक :

शिक्षणाच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी शैक्षणिक प्रशासन हे कार्यक्षम व प्रभावी असावे लागते. पंढरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळातील प्रशासनाची आजचीस्थिती काय आहे हे जाणून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधनाचे काम संशोधकाने हाती घेतले. या प्रकरणात विषय प्रवेश, संशोधनाचा विषय, संशोधन विषयाचे महत्व, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची मर्यादा या बाबतची माहिती दिली आहे.

प्रकरण दुसरे - संबंधित साहित्याचा व संशोधनाचा अभ्यास :

या प्रकरणात संबंधित कोणत्या साहित्य ग्रंथांचा आणि कोणत्या संबंधित संशोधनाचा अभ्यास केला याचा उल्लेख केला आहे.

प्रकरण तिसरे - माध्यमिक शाळेचे प्रशासन :

माध्यमिक शाळेचे प्रशासन या बद्दलची तात्त्विक माहिती या प्रकरणांत दिली आहे. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व

मुख्याध्यापक यांचे हक्क, कर्तव्ये व सेवाशर्ती इत्यादि गोष्टींचा ऊहापोह यात केला आहे.

**प्रकरण चवथे – संशोधनाची कार्यपध्दती :**

या प्रकरणामध्ये प्रश्नावली, मुलाखती, भेटी व निरीक्षण या संशोधनाच्या साधनांचा वापर कसा केला या बाबतची माहिती दिली आहे.

**प्रकरण पाचवे – माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :**

या प्रकरणामध्ये माहितीचे विश्लेषण करून अर्थ निर्वचन केले आहे.

**प्रकरण सहावे – निष्कर्ष व शिफारशी :**

या प्रकरणांत केलेल्या संशोधनाचा सारांश, निष्कर्ष व शिफारशी या संबंधी माहिती दिली आहे. तसेच पुढील संशोधनासाठी विषय दिले आहेत.

*-*-*

## -:= संदर्भ =:-

[१] श्री. श्री. दा. ताम्हणकर : शैक्षणिक प्रशासन व नियोजन
पुणे, नूतन प्रकाशन,
पृष्ठ क्र. १

[२] श्री. श्री. दा. ताम्हणकर : तत्रैव
पृष्ठ क्र. २

[३] श्री. श्री. दा. ताम्हणकर : तत्रैव
पृष्ठ क्र. २

*-*-*